पाचोरा पोलीस स्टेशन

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** पाचोरा **Year (वर्ष):** 2022

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0119 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 25/03/2022 00:42 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 24/03/2022

**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 24/03/2022

**Time From (वेळेपासून):** 18:15 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 18:15 बजे

(b) **Information received at P.S.** *(माहिती मिळालेले पोलीस ठाणे):*

**Date (दिनांक ):** 25/03/2022 **Time (वेळ):** 00:26 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 002 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 25/03/2022 00:26 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) ***Direction and distance from P.S.*** *(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):* पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** तालुका कषी अधिकारी कार्यालय ,पाचोरा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश बाळकष्ण जाधव

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) ***UID No.*** *(यु.आय.डी. क्र.):*

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,*UID No.*,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | भोजे,पाचोरा,पाचोरा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | भोजे,पाचोरा,पाचोरा,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | ललीतकुमार विठ्ठल देवरे | | | 1. आनंद नगर पाचोरा,पाचोरा,पाचोरा, जळगाव,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रूपये दराची 03 चलनी नोटा. | 1,500.00 |

10 ***Total value of property (In Rs/-)***-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)): 1,500.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any** (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

पाचोरा पोलीस स्टेशन गुरण 119/2022 लाच लुचपत प्रतिबंधक ( सुधारीत) कायदा सन 1988 चे कलम 7 प्रमाणे मुळ तक्रारदार व फिर्यादी नाव- योगेश बाळकृष्ण जाधव वय- 32 व्यवसाय- शेती रा .भोजे ता पाचोरा जि जळगावआरोपी नाव पत्ता - 1) ललीतकुमार विठ्ठल देवरे वय 38 धंदा- नोकरी (कृषी सहाय्यक )नेमणुक तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाचोरा जि.जळगांव रा.आनंद नगर पाचोरा ता.पाचोरा जि. जळगांव मुळ रा.कळमसरा ता.पाचोरा जि.जळगांव (खाते - कृषी वर्ग 3)गुन्हा घडला . ता वेळ व ठिकाण- दि. 24/3/2022 रोजी 18/15 वाजता पाचोरा येथील तालुका कृषी आधिकारी कार्यालयाचे आवारात लाचेची मागणी रक्कम 1500/- रुपये स्विकारलेली रक्कम 1500/- रुपये त्यात 500 रूपये दराची 03 चलनी नोटा.सापळा अधिकारी व तपास अधिकारी नाव- श्री. एस.के.बच्छाव ,पोलीस निरीक्षक ,अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव खुलासा- यातील फिर्यादी यांची आई धोंडाबाई बाळकृष्ण जाधव यांचे नावे भोजे शिवारात शेत गट क्रमांक 107 मध्ये 57 आर व शेत गट क्रमांक 85 क मध्ये 40आर एवढी शेत जमीन आहे.फिर्यादी यांनी महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रीकी करण योजने अंतर्गत शेती कामा साठी लागणारे 8 हॉर्स पॉवर चे बीसीएस पॉवर टिटर खरेदी केले होते आरोपी याने फिर्यादीस तुमचे पॉवर टिलर अनुदानाचे काम करुन दिले असुन सदर टिलर खरेदीचे अनुदान 85,000/-रुपये तुमच्या आईच्या खात्यात जमा झाले आहेत असे सांगुन 5000/-रुपयाची मागणी करुन प्रथम 3500/- रुपये रोख स्वरुपात स्विकारुन उर्वरीत 1500/- रुपये लाच मागणी केली असल्याबाबत फिर्यादी यांनी दिनांक 24/03/2022 रोजी अँन्टीकरप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.सदर तक्रारीची दिनांक 24/03/2022 रोजी ला.प्र.वि. जळगांव पथकाने पंच साक्षीदारांना समक्ष पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी फिर्यादी यांचे पॉवर टिलर अनुदानाचे काम करुन दिले व सदर टिलर खरेदीचे अनुदान 85,000/- रुपये तुमच्या आईच्या खात्यावर जमा केले आहे.असे सांगुन फिर्यादी यांचे कडे पंचा समक्ष उर्वरीत 1500/-रुपये लाचेची मागणी केली तसेच सदर लाचेची रक्कम आरोपी याने वर नमुद वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचेकडुन पंचासमक्ष स्वता स्विकारली म्हणुन गुन्हा वैगेरे मजकुराची खबर वरुन वर प्रमाणे गुन्हा दाखल करुन खबरी रिपोर्ट अधिकार असणारे मॅजि याच्याकडे रवाना करुन गुन्ह्याबाबत वरीष्ठआंना व बिनतारी सदेशाव्दारे कळवुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. एस,के.बच्छाव ,पोलीस निरीक्षक ,अँन्टी करप्शन ब्युरो जळगाव हे करीत आहेत.सदर सविस्तर टंकलिखीत केलेली फिर्याद सोबत जोडली आहे.

13.Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ~~MUKUNDA Indalsing PARDESHI~~

**Rank** (पद): PC (Police Constable)

**No.**(क्र.): 17101000599MIP **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14.**Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer-in-charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name**(नाव): RISAN LAXAMAN NAJAN

**Rank**(पद): I (Inspector)

**No.**(सं.): POBN64414

पोलीस ठाणे अंमलदार
पाचोरा पोलीस स्टेशन
जि. जळगाव

फिर्याद

पाचोरा पोलीस स्टेशन
दिनांक २५.०३.२०२२

**मी योगेश बाळकृष्ण जाधव, वय ३२ वर्षे, व्यवसाय शेती रा.भोजे ता.पाचोरा जि. जळगांव**

समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई,वडील,पत्नी व मुलांसह राहतो. दि.२३.०३.२०२२ रोजी सायंकाळी मी जळगांव अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस उपअधिक्षक श्री.एस.एस.पाटील साहेब यांचेशी संपर्क साधुन पाचोरा येथील कृषी सहायक,ललीत देवरे यांचे विरुध्द लाचे सबंधी तक्रार असल्याचे कळविले होते.तेव्हा मी पाटील साहेब यांना दि.२४.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता आपणास पाचोरा ते भडगांव रोडवरील रिलायन्स पेट्रोलपंपा जवळ भेटणार असल्याचे कळविले होते.

त्याप्रमाणे दि.२४.०३.२०२२ रोजी सकाळी ११.०० वा.मी माझे स्वत:चे मोटार सायकलसह पाचोरा ते भडगांव रोडवरील रिलायन्स पेट्रोलपंपा जवळ उपस्थित होतो. तेव्हा एक खाजगी तवेरा वाहन माझे जवळ येवुन थांबले व सदर वाहनात असलेले श्री. पाटील साहेब यांनी मला माझे नाव गाव विचारले व मला सदर वाहनात बसवुन घेतले. त्यानंतर श्री.पाटील साहेब यांनी स्वत:ची ओळख करुन दिली. तसेच श्री.पाटील साहेब यांनी वाहनात उपस्थीत असलेले अॅन्टी करप्शन ब्युरोचे पोलीस निरीक्षक बच्छाव साहेब यांची सापळा अधिकारी म्हणुन ओळख करुन दिली त्यानंतर वाहनात उपस्थित असलेले दोन शासकीय पंच, सापळा पथकाचे कर्मचारी व माझी आपआपसात ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझी तक्रार अॅन्टी करप्शन ब्युरो,कार्यालयाचे पोलीस निरीक्षक श्री. एस.के.बच्छाव साहेब यांचे समक्ष कथन केली. त्यानंतर मी माझी तक्रार स्वत:चे हस्ताक्षरात को–या कागदावर लिहून दिली ती खालील प्रमाणे आहे.

समक्ष हजर राहुन तक्रार लिहून देतो की, मी वरील ठिकाणी माझे आई,वडील, पत्नी व मुलासह राहतो. माझी आई नामे धोंडाबाई व वडील नामे बाळकृष्ण जाधव यांचे नावे भोजे ता.पाचोरा शिवारात शेत जमिन आहे. त्यावर आमचा उदरनिर्वाह चालतो.

माझी आई धोंडाबाई बाळकृष्ण जाधव हिचे नावे भोजे शिवार शेत गट नं.१०७ मध्ये ५७ आर व शेत गट नं.८५/क मध्ये ४० आर एवढी शेत जमिन आहे. महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शेती कामासाठी लागणारे विविध प्रकारचे यंत्र खेरदी करण्यासाठी शासनाकडुन अनुदान मिळत असले बाबत मला माहीती मिळाली. त्यानुसार माझे आई वडीलांशी चर्चा करुन शेती कामासाठी लागणारे आठ हॉर्स पॉवरचे बीसीएस पॉवर टिलर खरेदी करण्याचे आम्ही ठरविले. त्याप्रमाणे माझे आईचे नावे दि.२०.०५.२०२१ रोजी सदरचे पॉवर टिलर घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय, पाचोरा यांचेकडेस ऑनलाईन अर्ज सादर केला. त्यानंतर दि.२१.१२.२०२१ रोजी पॉवर टिलर विकत घेण्यासाठी तालुका कृषी अधिकारी पाचोरा यांनी पुर्वसंमती दिली.

त्यानंतर दि.२३.१२.२०२१ रोजी आम्ही माझे आईचे नावे रेणुका सेल्स, पाचोरा यांचेकडुन २,२१,०००/–रुपयास आठ हॉर्स पॉवरचे बीसीएस पॉवर टिलर रोखीने खरेदी केले. त्यानंतर महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत अनुदान मिळण्यासाठी लागणारे कागदपत्र व खरेदीचे बिल तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाचोरा येथे जावुन संबधीत कृषी सहायक,ललीत देवरे यांचेकडेस पडताळणीसाठी जमा केले. त्यानंतर कृषी सहायक श्री.ललीत देवरे यांनी माझे घरी येवुन पॉवर टिलर खरेदी केले बाबतची पडताळणी केली.

काही दिवसानंतर देखील सदर पॉवर टिलर अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाचोरा येथील कृषी सहायक ललीत देवरे यांची भेट घेतली व त्यांना अनुदानाबाबत विचारपुस केली असता त्यांनी मला सांगितले की, तुमचे पॉवर टिलर खरेदीचे अनुदान लवकरात लवकर काढुन आणुन देतो असे सांगुन तुम्ही मला त्यासाठी ५०००/–रु.आणुन द्या, मी लागलीच तुमचे अनुदान मंजुरीच्या प्रस्तावाची पडताळणी करुन अनुदान तुम्हाला लवकर मिळवुन देतो असे सांगितले. तेव्हा मी त्यांना सद्या माझे जवळ पैसे नाहीत, तुम्ही माझे अनुदान मंजुरीचे काम लवकर करुन द्या, मी नंतर तुम्हाला पैसे आणुन देईल असे सांगुन निघुन आलो होतो.

त्यानंतर देखील अनुदानाची रक्कम न मिळाल्यामुळे मी दि.१५.०३.२०२२ रोजी तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाचोरा येथे जावुन ललीत देवरे कृषी सहायक यांची भेट घेतली व अनुदानाबाबत विचारपुस केली असता त्यांनी सांगितले की, तुम्ही सांगितल्याप्रमाणे मी तुमच्या अनुदानाचे काम करुन दिले असुन सदर टिलर खरेदीचे अनुदान ८५,०००/–रु.तुमच्या आईच्या खात्यावर जमा झाले आहेत. मी सांगितल्याप्रमाणे तुम्ही मला ५०००/–रु.आणुन दया असे सांगितले. तेव्हा मी त्यांना माझे आईच्या खात्यात पैसे जमा झाले किंवा नाही याची खात्री करुन मी तुम्हाला ५०००/–रु.आणुन देतो असे सांगुन निघुन आलो होतो. त्यानंतर ललीत देवरे यांची ५०००/–रु.मागणीची बाब मी गांभीर्याने घेतली नाही.

त्यानंतर दि.२१.०३.२०२२ रोजी मी तालुका कृषी अधिकारी कार्यालय पाचोरा येथे इतर शासकिय योजनेची माहीती घेण्याकरीता गेलो असता सदर कार्यालयात ललीत देवरे हे भेटले. तेव्हा त्यांनी मला तुझे आईचे खात्यावर पॉवर टिलर खरेदीचे ८५,०००/–रु.अनुदान जमा करुन एक महिना होत आला, तरी सुध्दा मी सांगितल्याप्रमाणे तु मला ५०००/–रु.आणुन दिले नाही,मी विश्वासावर तुझे काम लवकर करुन आणुन दिले, तु जर मला पैसे दिले नाही तर मी तुझे यापुढे कोणतेही काम करणार नाही,तुझे शेतीचे कोणतेही काम माझेकडेच राहील असे सांगुन आता पैसे आणले आहेत का? असे विचारले. तेव्हा मी त्यांना आता माझे जवळ फक्त ३५००/–रु.आहेत असे सांगितले. तेव्हा त्यांनी ठिक आहे, आता तेवढे देवुन टाक असे सांगितले. तेव्हा माझी इच्छा नसतांना नाईलाजास्तव माझेजवळ असलेले ३५००/–रु.मी ललीत देवरे यांना दिले. तेव्हा त्यांनी सांगितले की,उर्वरीत १५००/–रु.तु मला दोन/चार दिवसात आणुन दे, तु जर पैसे आणुन दिले नाही, तर मी तुझे शेतीच्या इतर कोणत्याही शासकिय योजनेचे काम मी करणार नाही असे सांगितले असता मी त्यांना दोन/चार दिवसात उर्वरीत १५००/–रु.आणुन देतो असे सांगितले.

पाचोरा पो.स्टे. गु.र.नं. ११९/२२ भ्र.प्र.अधि.१९८८चे कलम ०७ प्रमाणे इन्द्री ५.०२ वर ००:२६ वा नोंद घेतली आहे

पोलीस ठाणे अंमलदार
पाचोरा पोलीस स्टेशन
जि.जळगांव

तेव्हा त्यांनी तु ऑफिसला येण्याचे अगोदर माझे मोबाईल फोनवर फोन करुन ये असे सांगितले. त्यानंतर मी सदर ठिकाणाहुन निघुन आलो. त्यानंतर सदर अनुदान मिळण्यासाठी कोणत्याही प्रकारचे शासकिय फि स्वरुपात पैसे लागत नसल्याचे मला समजले. त्यावरुन कृषी सहायक ललीत देवरे हे माझेकडेस लाचेची मागणी करीत असल्याबाबत माझी खात्री झाली. त्यामुळे मी त्यांचे विरुध्द लाचेसंबधी तक्रार देण्याचे ठरविले.

तरी माझे आईचे नावे असलेल्या शेत जमिनीचे कामासाठी महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रिकीकरण योजने अंतर्गत अनुदानाचे काम करुन दिले व सदर टिलर खरेदीचे अनुदान ८५,०००/—रु.माझे आईच्या खात्यावर लवकर जमा केले आहेत असे सांगुन त्यामोबदल्यात कृषी सहायक ललीत देवरे यांनी १५००/—रु.लाच मागणी केली आहे. मला त्यांना उर्वरीत १५००/—रु.लाच रक्कम देण्याची माझी मनापासुन इच्छा नाही. परंतु मी जर कृषी सहायक ललीत देवरे यांना उर्वरीत १५००/—रु.लाच रक्कम दिली नाही तर ते यापुढे माझे शेतीच्या इतर कोणत्याही शासकिय योजनांचा फायदा होवु देणार नाही किंवा त्यात अडथळा निर्माण करतील म्हणुन मी नाईलाजाने कृषी सहायक,ललीत देवरे यांना उर्वरीत १५००/—रु. लाच रक्कम देण्यास तयार झालो आहे. मी कृषी सहायक,ललीत देवरे यांना दि.२४.०३.२०२२ रोजी त्यांचे मोबाईल फोनवर फोन करुन त्यांची भेट घेण्यासाठी ते सांगतील त्या ठिकाणी जाणार आहे.तरी त्यांचे विरुध्द योग्य ती कारवाई व्हावी बाबत तक्रार दिली.

त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना थोडक्यात सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी त्यांचे कडेस असलेले डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखविले व त्यामध्ये नविन मेमरी कार्ड टाकुन ते सुरु करुन माझे व दोन्ही पंचाचे वक्तव्य ध्वनीमुद्रीत केले. त्यानंतर कृषी सहायक ललीत देवरे यांनी मला सांगितल्याप्रमाणे त्यांची भेट घेण्याअगोदर त्यांचे मोबाईल फोनवर फोन केला. तेव्हा त्यांनी मला अटलगव्हाण कोल्हयाचे रस्त्यावर आहे, यायला वेळ लागेल, तुम्ही मार्केटजवळ भेटा असे सांगितले. त्यानंतर ललीत देवरे यांना येण्यास वेळ असल्याने त्यांची वाट पाहीली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा सुचना देवुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला पंच क्रं.१ यांचेसह पाचोरा शहरातील मार्केटजवळ कृषी सहायक,ललीत देवरे यांची भेट घेण्यासाठी माझे मोटार सायकलसह पाठविले होते. तेव्हा मी पंच क्रं १ यांचेसह पाचोरा शहरातील मार्केटजवळ गेलो. परंतु सदर ठिकाणी कृषी सहायक,ललीत देवरे हे दिसुन आले नाहीत. करीता मी कृषी सहायक,ललीत देवरे यांना मोबाईल फोनवर फोन केला. तेव्हा त्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयात येण्यास सांगितले. त्यानुसार मी पंच क्रं.१ यांचेसह तालुका कृषी अधिकारी कार्यालयात गेलो. त्यानंतर मी माझी मोटार सायकल कार्यालयाच्या आवारात उभी केली. त्यानंतर मी व पंच क्रं.१ असे तालुका कृषी अधिकारी कार्यालयात गेलो. तेव्हा सदर कार्यालयात कृषी सहायक,ललीत देवरे यांच्याशी माझी भेट झाली. तेव्हा माझेत व कृषी सहायक,ललीत देवरे यांचेत माझे अनुदानाचे कामाविषयी चर्चा झाली. तेव्हा मी कृषी सहायक,ललीत देवरे यांना अनुदान पडलं, बरं झाले असे सांगितले. तेव्हा ललीत देवरे यांनी मला तुम्ही पहिले किती दिले असे विचारले असता मी साडेतीन असे सांगितले व आता किती देवु असे विचारले असता कृषी सहायक,ललीत देवरे यांनी जे आहे ते द्या, मी तुम्हाला जास्त मागणार नाही असे सांगितले. तेव्हा मी तुम्हाला पंधराशे रुपये सांगितले होते असे सांगितले असता त्यांनी मला होकार दर्शविला व लाच रक्कम स्विकारण्यास संमती दिली. तेव्हा मी कृषी सहायक,ललीत देवरे यांना दहा मिनिटात येतो असे सांगुन मी व पंच क्रं.१ असे सापळा पथकाजवळ परत आलो होतो. त्यानंतर माझे व कृषी सहायक,ललीत देवरे यांचे मधील संभाषण दोन्ही पंचानी व बच्छाव साहेब यांनी ऐकले.तेव्हा दोन्ही पंच व बच्छाव साहेब यांची लाचमागणी बाबत खात्री झाल्याने व वेळ कमी असल्याने बच्छाव साहेब यांनी पुढील सापळा कार्यवाही सलगपणे करण्याचा निर्णय घेतला.

त्यानंतर कृषी सहायक,ललीत देवरे यांना देण्यासाठी मी माझे घर खर्चामधुन आणलेली १५००/—रू. रक्कम (त्यात ५००/—रू.दराच्या ०३ नोटा) बच्छाव साहेब यांचे समक्ष हजर केली. तेव्हा बच्छाव साहेब यांचे सुचनेनुसार पोकॉ/ईश्वर धनगर यांनी सदर नोटांना अ.पावडर लावुन सदरच्या नोटा माझे शर्टचे पुढील डाव्या बाजुच्या खिशयात अलगद ठेवुन दिल्या होत्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी मला व पंच क्रं.१ अशांना पुन्हा महत्वाच्या सुचना दिल्या. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये पुन्हा नविन मेमरी कार्ड टाकुन सदरचे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन ते माझे गळयात लटकवुन दिले. त्यानंतर मला पंच क्रं.१ यांचेसह कृषी सहायक,ललीत देवरे यांना त्यांचे मागणी प्रमाणे १५००/— रुपये लाच रक्कम देण्यासाठी पाचोरा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे पाठविले होते. त्यानंतर मी पंच क्र.१ यांचे सह पाचोरा तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे गेलो. मी माझी मोटार सायकल पाचोरा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या आवारात उभी केली. तेव्हा बच्छाव साहेब यांनी पाचोरा तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या आजुबाजुस सापळा लावला होता. तेव्हा मी कार्यालयाच्या आवारातुन कृषी सहायक,ललीत देवरे यांचे मोबाईल फोनवर फोन केला.तेव्हा कृषी सहायक,ललीत देवरे यांनी मला बाहेर येतो असे सांगितले. परंतु बराच वेळ होवुन देखील कृषी सहायक,ललीत देवरे हे कार्यालयाच्या आवारात न आल्यामुळे मी पुन्हा त्यांचे मोबाईल फोनवर फोन केला असता त्यांनी मी आलोच असे सांगितले. त्यानंतर काही वेळाने कृषी सहायक,ललीत देवरे हे मी व पंच क्रं.१ असे उभे असलेल्या ठिकाणी आले.

तेव्हा माझी कृषी सहायक,ललीत देवरे यांचेशी भेट झाली. तेव्हा ३कृषी सहायक,ललीत देवरे यांनी उजव्या हाताचा अंगठा व पहील्या बोटाने ईशारा करुन पैसे आणले आहेत का? असे विचारले तेव्हा मी माझे शर्टचे वरील डाव्या बाजुच्या खिश्यात असलेली लाच रक्कम १५००/—रु. उजव्या हाताने बाहेर काढून सदर लाच रक्कम कृषी सहायक,ललीत देवरे यांचे समोर धरली व पॉवर टिलरचे १५००/—रु.राहीले आहे, ते घ्या, मोजुन घ्या, असे सांगुन सदर लाचेची रक्कम कृषी सहायक,ललीत देवरे यांना दिली तेव्हा कृषी सहायक,ललीत देवरे यांनी सदर १५००/—रु.लाच रक्कम त्यांच्या उजव्या हाताने स्विकारुन सदर लाच रक्कम

त्यांचे शर्टच्या पुढील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन घेतली. त्यानंतर मी ठरवुन दिल्या प्रमाणे सापळा पथकास ईशारा केला. तेव्हा बच्छाव साहेब व सापळा पथक यांनी कृषी सहायक,ललीत देवरे यास रंगेहाथ पकडले. त्यानंतर बच्छाव साहेब यांचे सुचने नुसार माझे गळयातील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बाहेर काढुन ते बंद केले. तेव्हा बच्छाव साहेब यांनी कृषी सहायक,ललीत देवरे यांना त्यांची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर बच्छाव साहेब यांनी कृषी सहायक,ललीत देवरे यांना त्यांचे पुर्ण नाव, गांव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव ललीतकुमार विठठल देवरे,वय ३८,व्यवसाय नोकरी,कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,पाचोरा जि.जळगांव रा.आनंदनगर, पाचोरा ता.पाचोरा जि.जळगांव मुळ रा.कळमसरा ता.पाचोरा असे सांगितले. त्यानंतर सापळा पथकाने कृषी सहायक,ललीत देवरे यांना ताब्यात घेतले.

त्यानंतर पुढील कारवाई पाचोरा तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील एका कक्षात करण्यात आली. सदर कक्षामध्ये माझे,आरोपी कृषी सहायक,ललीत देवरे व दोन्ही पंचाच्या हातांची अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या प्रकाशात तपासणी केली. त्यानंतर पुढील उर्वरीत सापळा कारवाई अॅन्टी करप्शन ब्युरो जळगांव कार्यालयात केली आहे.तसा सलगपणे सविस्तर पंचनामा केला आहे.

अशा प्रकारे आरोपी ललीतकुमार विठठल देवरे,कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,पाचोरा जि.जळगांव यांनी दि.२४.०३.२०२२ रोजी पंचासमक्ष माझे पॉवर टिलरचे महाराष्ट्र राज्य कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत मिळणारे अनुदानाचे काम करुन दिले व सदर टिलर खरेदीचे अनुदान ८५,०००/–रु.माझे आईच्या खात्यावर जमा केले आहे असे सांगुन त्या मोबदल्यात माझे कडेस १५००/–रुपये लाच मागणी केली व सदर लाच रक्कम आरोपी ललीतकुमार देवरे यांनी दि.२४.०३.२०२२ रोजी १८.१५ वा. पाचोरा येथील तालुका कृषी अधिकारी कार्यालयाचे आवारात स्वत: स्विकारली आहे.म्हणुन माझी आरोपी ललीतकुमार विठठल देवरे,कृषी सहायक, तालुका कृषी अधिकारी कार्यालय,पाचोरा जि.जळगांव यांचे विरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील नमुद फिर्याद मी सांगितल्या प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन ती मी वाचुन पाहीली ती मी सांगितल्या प्रमाणे टंकलीखीत केली असुन ती बरोबर व खरी आहे.

**समक्ष,**

[signature]

**एस.के.बच्छाव**
**पोलीस निरिक्षक**
**अॅन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**

**फिर्यादीची सही**

[signature]

दि. 24.03.2022